# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१७८/२०१५ मधील
# निशाणी क्र.११२ वर आदेश
**CNRNO.MHLA110002822018.**

---

०१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

०२. सदरचा अर्ज प्रतिवादींनी अर्जामध्ये नमुद साक्षीदाराला साक्षीसमन्स काढण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जाला वादीने म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शविलेला आहे. सदर प्रकरणातील दावा हा मिळकतींच्या वाटपाकरिता दाखल असुन पक्षकारांमध्ये रघुराम घोटाळे यांच्या मृत्यूच्या तारखेबाबत महत्वाचा वाद आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील दाव्यातील व कैफियतमधील कथन विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, प्रतिवादींनी साक्षीदारांची यादी दाखल केलेली नसली तरी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टिने प्रतिवादींना बचावाच्या अनुषंगाने पुरावा दाखल करण्यास संधी देणे न्यायोचित होणार आहे. तसेच अर्जात नमुद साक्षीदार साक्षीसाठी हजर झाल्यानंतर त्याबाबत बाजु मांडण्याची वादीला संधी मिळणार आहे. सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.११२ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.
२. प्रतिवादींकडुन नियमाप्रमाणे साक्ष भत्ता स्वीकारुन अर्जात नमुद साक्षीदाराला अर्जात नमुद कागदपत्रांसह साक्षीसाठी हजर राहण्याकरिता साक्षीसमन्स काढावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2021.01.01 16:23:05 +0530

दि.०१.०१.२०२१. (शिवकांत म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.